

**St. Mira's College for Girls**
**(Autonomous-Affiliated to Savitribai Phule Pune University)**
**Subject: Marathi SEC**
**Subject Code: ACSECCM22302**
**Semester: II**
**Year: 2023-24**

**Unit focusing on either Skill Development, Employability and Entrepreneurship or all of these: Example Unit 3: Skill Development/ All of these**

**Paste your assignment photo or screenshot here**

https://acrobat.adobe.com/id/urn:aaid:sc:AP:142e1592-c523-438d-a643-4ec74f89c17a





स्वाध्याय प्रश्न :

१. दशावतार व भारुड या लोककला प्रकारांचे स्वरुप छायाचित्रांसह विशद करा.

२. मंगळागौर व भोंडला या पारंपरिक खेळांची ओळख त्यातील गीतांच्या आधारे करून द्या.

पूर्तता दिनांक - १३/०२/२०२४

Signed by: Jaya Rajagopalan
Reason: NAAC Documentation
Location: Pune, India
Date: 19-Dec-2024 (12:22 PM)

## दशावतार

अलिकडील काळात डॉ. बाळकृष्ण लळित यांनी पूर्वसूरींनी केलेल्या अभ्यासाचा माकल्याने आढावा घेऊन 'दशावतारी' नाट्यप्रयोगांचा अभ्यास पुढे नेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या मते "सर्वसामान्यपणे या लोककलेला 'लोकनाट्य' म्हणण्यात येत असले तरी तिचे जुने रूप विधिनाट्याला जवळचे आहे." याचा अर्थ कोकणी आणि गोमंतकीय नाट्यकलेचा पाया दशावतारींनी घातला, असे म्हणण्यास वाव आहे. तसेच दशावतारी प्रयोग हे किनारापट्टीवरील 'लोकोत्सव' म्हणता येतील. अलिकडे तर दशावतारी नाट्यमंडळ्या स्थापन झाल्या असून त्यांचे प्रयोग मुंबईतही होऊ लागले आहेत. अर्थातच लोकनाट्य ते अभिजात नाटक असा हा प्रवास सुरू आहे. दशावतारींची अडिवरे पध्दत, चेंदवणकर गोरेशास्त्री पध्दत आणि आधुनिक असे तीन प्रकार डॉ. लळितांनी नोंदविले आहेत.



बहुधा भगवान विष्णूंच्या दशावतारांशी संबंध जोडलेला असतो. सुरुवातीला वाद्यांच्या गजरात पदे सुरु होतात. त्याच पार्श्वभूमीवर मुख्य पात्र प्रवेशते व तेच खेळातील आख्यानाचा परिचय करुन देते. राजा हरिश्चंद्र, रामायण, महाभारतातील

FOR EDUCATIONAL USE

Scanned with CamScanner



प्रसंग, सती तुलसी, सती महानंदा, सती रेणुका, बाळ चिलिया, इंद्रजीत वध, जालंधर वध असे विषय निवडलेले असतात. विषयानुसार खेळ चमूतील भूमिका व पात्रे ठरतात, वेशभूषा ठरतात. यात प्रत्येकाला खूपच स्वातंत्र्य असते. यातील युध्दासाठीची गदा, तलवारी, सुदर्शन, परशु आदी हत्यारे स्वतःच करून घ्यावी असतात. विविध प्रवेश संवाद, संगीत याबरोबरच युध्दप्रसंग आवर्जून असतोच. सुरुवात गणपती, ऋध्दिसिध्दी यांच्यासह प्रवेशून मंगल होते. सूत्रधार नाटक घडवितो. या खेळात सर्वात महत्त्वाचे वेधक व आगळवेगळे पात्र म्हणजे संकासूर होय. संकासूराने वेद समुद्रात लपवून ठेवले. मच्छावतार घेऊन विष्णूंनी संकासूराचा वध करून ते पुन्हा आणले. अर्थातच पहिल्या अवतारापासून असूर आणि सूर यांचे युध्द ही मध्यवर्ती कल्पना दिसते. त्यामुळेच संकासूर या पात्राला संघर्ष आणि घटना घटीत या दृष्टीने महत्त्व असणे स्वाभाविकच आहे.



Scanned with CamScanner

Signed by: Jaya Rajagopalan
Reason: NAAC Documentation
Location: Pune, India
Date: 19-Dec-2024 (12:22 PM)

संपादणी करणारा, सूत्रधार आणि संकासूर या ३ पात्रांमुळे एकूण संहितेला आकार येतो असे म्हणता येईल. दशावतारी सादर करण्यात संपूर्ण गावाचा पंचक्रोशीचा सहभाग असतो. सूत्रधार खेळाची माहिती, पात्रांचे गणापासूनचे आवाहन करतो. संभाचे जानवे घातलेला पुजारी सोंगे घेऊन घुमू लागत आणि सूत्रधार गाडीवान होऊन कोण आहेस? का आलास? अस विचारून नंतर देवदेवतांची सोंगे आवाहित करतो. ब्रम्हदेव व संकासूर अशी दोन येतात आणि संकासूराची वेद चोरण्याची कर सादर होते.



दशावतार खेळात सूत्रधार, संकासूर, सरस्वती, गणपती, राम अशी सोंगे किंवा पात्रे येतात. स्वतंत्र रंगमंच नसतो. मैदानात, देवळापुढे, रस्त्याच्या कडेला ग्रामोत्सवप्रसंग दशावतार खेळ सूत्रधाराने मांडली की भोवती लोक बसतात. स लोकही खरेतर त्यात सहभागी असतात.

कोकणातील दशावतारी खेळ आणि मराठवाड्यातील दशावतारी ललित यात भेद म्हणजे भवाड्याप्रमाणे ललितात दशावतारीची सोंगे काढली जातात व त्यांचे नृत्य होते. कोकण दशावतारी नाटक असतो.

FOR EDUCATIONAL USE

Scanned with CamScanner

## भारुड



एकनाथी भारुडे, विंचू चावला, बाईसाब आल्या इ. प्रसिध्द आहेत. एकनाथांप्रमाणे खरेतर सर्वच संतांनी कमीअधिक प्रमाणात रूपकांची रचना केली आहे. रुपके ही सोंगे आणून किंवा साभिनय सादर करण्याची परंपरा वारकरी दिंड्या, भजन कार्यक्रम यांत दिसतो. स्वतंत्र भारुडांचे कार्यक्रमही होतात.

भारुडात विधी नसतो, मात्र पूजाविधी ऐच्छिक असतो नृत्य व मधूनमधून संपादणी असे यात स्वरूप असते. एकनाथी भारुडातील रूपके सोंगे घेऊन नाचून सादर केली जातात. जसेल तशी वेशभूषा व रंगभूषा करून रंगकर्मी रंगपीठात येतो व भारुडाच्या धृपदावर नाच करतो. पात्र रंगपीठात प्रवेश करते तेव्हा त्याचा परिचय प्रेक्षकांना व्हावा म्हणून त्याला प्रश्न विचारले जातात. त्याला विनोदी पध्दतीने हजरजबाबीपणाने उत्तरे दिली जातात. कोण कुठले ही माहिती सांगितल्यावर पात्र आपल्या [illegible] संपादणी केली जाते.


MODERN COLLEGE FOR GIRLS, PUNE-411001

eSign
Signed by: Jaya Rajagopalan
Reason: NAAC Documentation
Location: Pune, India
Date: 19-Dec-2024 (12:22 PM)

एकनाथांची भारुडे ही विलक्षण नाट्यात्मक आहेत. ती गाताना त्यातील पात्रांची सोंगे आणली जातात आणि प्रसंगानुरूपवतावणी करण्यात येते. '[illegible]' 'विंचू चावला' या भारुडाचे लक्ष्य आहे कामक्रोधाने होणारी मनोवस्था हे पण त्यात अभिनय आहे तो वृश्चिकदंशाचा. हीच गोष्ट इतर भारुडांची.



भारुडातील गेयता म्हणजे लोकसंगीतातील गेयता. ढोलकी, डमरू, तुमडी, दिमडी, टाळ, चाळ, तुणतुणे, वेणू यांसारख्या वाद्यांच्या साथीवर वासुदेव, गोंधळी, वाघ्यामुरळी, डोंरी, फकीर तसेच देवळात व घरात कीर्तनकार व स्त्रिया जी गीत गात, त्यांचा ताल व ढंग, त्यांची चाल व लय बरोबर पकडून एकनाथांनी भारुडे रचल्यामुळे ती लोकगायकांच्या कंठांत चपखल बसली आणि लोकप्रिय झाली.



FOR EDUCATIONAL USE

Scanned with CamScanner

मंगळागौर



मंगळागौर हे नवविवाहीत स्त्री ने करण्याचे एक व्रत ाहे. श्रावण महिन्यातील प्रत्येक मंगळवारी लग्नानंतर पाचे वर्षे हे त करण्यात येते. यासाठी नवविवाहीत महिला सकाळी स्नान रून सोवळे नेसून पूजा करण्यासाठी बसतात. मंगळागौर अर्थात र्वती. शेजारी महादेवाची पिंडही ठेवली जाते.

पूजा झाल्यावर पिठाच्या किंवा पुरणाच्या दिव्यांनी ंगळागौरीची कथा (कहाणी) भटजींकडून ऐकतात. पूजेनंतर रात्री ागरण करण्यात येते. जागरणाच्या वेळी मंगळागौरीला विविध ळ खेळण्याचा अनादी काळापासून चालत आलेला प्रघात आहे. ामध्ये लाटच्या बाई लाटया सारंगी लाट्या, फू बाई फू अशी ारंपरिक खेळ व गाणी गाण्याची खूपच मजा असते.

नऊवारी साडी, नाकात नथ, दागिने असा पेहराव करून व्या नवरीला नटण्यासाठी आणि आपल्या घरातील विविध ंकांची ओळख करून घेण्यासाठी हा खास कार्यक्रम आखला ातो.

eSign Signed by: Jaya Rajagopalan
Reason: NAAC Documentation
Location: Pune, India
Date: 19-Dec-2024 (12:22 PM)

मंगळागौरीची कहाणी / कथा पूजेच्या वेळी भटजींद्वारे सांगण्यात येते. मंगळागौरीच्या व्रताचे उद्यापन पाच वर्षानंतर करण्यात येते. लग्न झाल्यापासून पाचव्या वर्षी श्रावणातील शेवटच्या मंगळवारी या व्रताचे उद्यापन करण्यात येते. उद्यापणाच्या वेळी आई - वडिलांना वाण देण्यास येते. मुलीने आईला सोन्याची मूर्ती देण्याची पध्दत आहे. आईने मुलीला व जावयाला ताटामध्ये लाडू अथवा वड्या घालून द्यायचे. मुलीच्या आईला उद्यापनात वाण म्हणून एकसर (काळे मणी आणि सोन्याचा मणी), जोडवी, कुंकू, कंगवा व आरसा देण्याची पध्दत आहे. मुलीच्या वडिलांना शर्ट, धोतर, टोपी आणि उपरणे अशी भेट देतात.





'या गावाचा त्या गावाचा माळी नाही
आला वेणी नाही मला कशी मी नाचू
नाच ग घुमा कशी मी नाचू
या गावाचा त्या गावाचा शिंपी नाही आला
चोळी नाही मला कशी मी नाचू
नाच ग घुमा कशी मी नाचू.'

FOR EDUCATIONAL USE

Scanned with CamScanner

## भोंडला

महाराष्ट्रात भुलोबा, हादगा व भुलाबाई यांचा सुफलनाचा विधीउत्सव म्हणून भोंडला मांडला जातो. हा उत्सव मुली, बायका साजरा करतात. चंद्र - सूर्य पाटावर काढून हस्तनक्षत्रात पूजा मांडली जाते. ही पूजा करून मुली फेरावरची गाणी म्हणतात. फेरावरच्या गाण्यांना फेऱ्याची लय, ताल, ठेका आणि ठसका असतो.



बहुधा पाटावर 'हस्त' नक्षत्राची महती म्हणून हत्ती काढतात. ~~अगस्त~~ 'अगस्त्य' ऋषींची पूजा महत्त्वाची आहे, कारण 'वरुण' राजाच्या ऋतुचक्राचा तो अधिपती आहे. अगस्त्यचे 'हस्त' झाले असावे असाही समज आहे. अगस्त्यतारा भाद्रपदात शेवटी शेवटी उगवतो, आश्विन सुरु होतो. आभाळ निरभ्र होते आणि सुफलनाचा काळ सुरु होतो. भोंडल्याची गाणी परंपरेने गायली जातात. भोंडला हातम्यात गणेशाच्या आवाहनाने सुरुवात करतात.

'अयलमा पैलमा गणेश देवा
माझा खेळ मांडू दे करीन तुझी सेवा.' इ.

FOR EDUCATIONAL USE

Signed by: Jaya Rajagopalan
Reason: NAAC Documentation
Location: Pune, India
Date: 19-Dec-2024 (12:22 PM)



नंतर भुलाबाईची गाणी सुरू होतात.
'कार्ल्य' 'कारल्याचं पेरलं ग सई
आजून भाऊजी आले नाही
कारल्याचा वेल आला ग सई
आजून भाऊजी आले नाही -'

कार्ले पूर्ण होईपर्यंत साखळी गीत. गाण्यातून हस्त नक्षत्राची पूजा होते आणि गाणी सुरू होतात.

'एक लिंबू झेलू बाई दोन लिंबू झेलू' इ.

'हस्त हा दीनचाची राजा
त्यासी नमस्कार माझा'

हादगा देव मी पूजीते 'ही पुरुषदेवता - भुलोबाला उद्देशून म्हटलेली गाणी वेदकालापासून परंपरेने आलेली असावीत. आणर एक नमुना गीत प्रपंचाचे दर्शन घडवते--

'यादव राया राणी घरासी येईल कैसी ?
सासू गेली समजावयाला
चला चला सूनबाई आपल्या घराला
मी नाही यायची आपल्या घराला
अर्धा संसार देते तुला
अर्धा संसार नको मला.'

FOR EDUCATIONAL USE

Scanned with CamScanner



'आला चेंडू गेला चेंडू
राया चेंडू झुगारिला
आपण चाले हत्ती घोडे
राम चाले पायी
रामाचा पत्ता कुठ नाही
राम ग वेचितो कळ्या
सीता ग गुंफिते जाळ्या'

या गीतात शेवटी सीता ही भूमिकन्या असून धरतीचे रूप मानले जाते तर राम-सावळा निळ्या आकाशाचे प्रतीक मानला जातो.

'आडात पडला शिंपला
आमचा भोंडला संपला !
याने सांगता होते
आणि सर्प म्हणे मी
खिरापतीला काय ग ?'

अशी विचारणा होऊन एकेक पदार्थांची नावे घेत खिरापत ओळखण्याची चढाओढ लागते. शेवटी गोड की तिखट ? अशा तऱ्हेच्या वाटाघाटी सुरू झाल्या की जिचा भोंडला असायचा तिला अगदी धन्य वाटते अशी या खेळाची गम्मत समजली जाते.

नृत्य, नाट्य, संगीतकलेचे समूहात्मदर्शन उत्सव विशीष्य निमित्ताने घडते. महाराष्ट्रात स्त्रियांची विधिनिगडित खेळगीते, पूजाविधी आणि विधिगीते यांची मोठी परंपरा आहे. उदा.- जागरण, मंगळागौर.

19/20

Signed by: Jaya Rajagopalan
Reason: NAAC Documentation
Location: Pune, India
Date: 19-Dec-2024 (12:22 PM)